**सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी ऑनलाईन**
**पद्धतीने नामतालिका तयार करणेबाबत**
**सन २०२६-२०२८**


सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

५- बी. जे.रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

**दुरध्वनी क्र.०२०-२६१२२८४६/४७,** **इमेलः-comm.audit.18@gmail.com**


---

**जा.क्र.: सआ-२०/ले.प. / लेखापरीक्षक नाम. सुधारित कृती कार्यक्रम / सन २०२६-२०२८/५६६/२०२६,**
**दिनांक :१८/०४/२०२६**

## शुद्धीपत्रक

**विषय : सन २०२६-२०२८ या कालावधीच्या लेखापरीक्षक नामिकेसंदर्भातील ऑनलाईन अर्ज मागणी, छाननी या संदर्भातील सुधारित कृती कार्यक्रम...**

**संदर्भ :** या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.: सआ-२०/लेखापरीक्षण/लेखापरीक्षक नामतालिका / सन २०२६-२०२८/५१२/२०२६, दिनांक १/ ०४/२०२६

**सन २०२६-२०२८** या कालावधीसाठीची राज्यस्तरीय लेखापरीक्षक नामतालिका तयार करण्यासाठी https://mahasahakar.maharashtra.gov.in संकेतस्थळावर दिनांक **०६/४/२०२६ ते २०/४/२०२६** या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आलेले आहेत. तथापी सदर संकेतस्थळावर सन २०२४-२०२६ या कालावधीत अस्तित्वात असलेले सर्व प्रकारचे लेखापरीक्षक व नव्याने अर्ज करणारे उमेदवार यांना अर्ज भरताना तांत्रिक अडचणी येत असल्याने, उक्त संकेतस्थळ दुरुस्तीसाठी वारंवार बंद ठेवावे लागले आहे. तसेच या कार्यालयास काही सनदी लेखापाल व प्रमाणित लेखापरीक्षकांच्या विविध संघटनाचे निवेदने प्राप्त झालेली असून काही लेखापरीक्षक यांनी दूरध्वनीद्वारे ऑनलाईन अर्ज भरताना तांत्रिक अडचणी येत असलेची बाब या कार्यालयाचे निदर्शनास आणून दिलेली आहे.

सन २०२४-२०२६ या कालावधीकरिता सहकार खात्याचे राज्यस्तरीय लेखापरीक्षक नामतालीकेवर सर्व प्रकारचे लेखापरीक्षकांची संख्या एकूण १३,७७९ इतकी आहे. सन २०२४-२०२६ या कालावधीचे नामतालीकेसाठी जवळपास १८,००० अर्ज प्राप्त झालेले होते. सन २०२६-२०२८ या कालावधीसाठी लेखापरीक्षक संकेतस्थळावर आज अखेर सर्व प्रकारच्या लेखापरीक्षकांचे जवळपास ८५०० चे वर ऑनलाईन अर्ज प्राप्त झालेले आहेत. यापुढे किमान १०,००० पेक्षा जास्त अर्ज प्राप्त होण्याची शक्यता आहे.

उक्त वस्तुस्थिती विचारत घेता, सन २०२६-२०२८ या कालावधीचे राज्यस्तरीय लेखापरीक्षक नामतालीकेकरिता संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज मागविण्यासाठी मुदतवाढ देणे आवश्यक झालेले आहे. त्यामुळे विषयांकीत प्रकरणी या संदर्भातील **अर्ज मागणी, छाननी बाबतचा** सुधारित कृती कार्यक्रम पुढील प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे.

**नामतालिकेसाठी ऑनलाईन अर्ज मागणी, छाननी यासंदर्भातील कृती कार्यक्रम :**

| अ. क्र. | कामकाजाचे स्वरुप | कालावधी | | दिवस |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | |
| १. | नामतालिका तयार करणेबाबतची सूचना प्रसिद्ध करणे.(ऑनलाईन पद्धतीने वेबसाईटवर, कार्यालयांचे नोटीस बोर्डवर, प्रसिद्ध करणे. इ.) | ०२/४/२०२६ | | १ |
| २. | नवीन नामतालिकेसाठी ऑनलाईन अर्ज व पात्रतेसंदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करण्याचा कालावधी. | ०६/४/२०२६ | ०५/५/२०२६ | ३० |
| ३. | नवीन नामतालिकेसाठी सादर झालेले ऑनलाईन अर्ज व पात्रतेसंदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे यांची छाननी जिल्हा स्तरावरील समितीने करणे. | ०६/५/२०२६ | २०/५/२०२६ | १५ |
| ४. | जिल्हा स्तरीय समितीने छाननी केलेल्या ऑनलाईन अर्जाची व पात्रतेसंदर्भातील आवश्यक त्या कागदपत्रांचीं तपासणी सहकार आयुक्त कार्यालय स्तरावर करणे. | २१/५/२०२६ | ०४/६/२०२६ | १५ |
| ५. | अस्विकृत अर्जांचे विरोधात तक्रार निवारण समितीकडे दाद मागणे, तसेच अस्विकृत अर्जांपैकी ज्यांनी तक्रार निवारण समितीकडे दाद मागितलेली आहे, त्यासंदर्भातील तक्रार निवारण समिती स्तरावरील छाननी कामकाज करणे व सहकार आयुक्त कार्यालयास दैनदिन अहवाल पाठविणे. | ०५/६/२०२६ | १४/६/२०२६ | १० |
| ६. | अस्विकृत अर्जांचे विरोधात तक्रार निवारण समितीकडे दाद मागितलेल्या अर्जांपैकी समितीने स्विकृत करणेसाठी शिफारस केलेल्या अर्जांसंदर्भातील छाननी कामकाज सहकार आयुक्त कार्यालय स्तरावर करणे. | १५/६/२०२६ | २४/६/२०२६ | १० |
| ७. | पात्र लेखापरीक्षकांची यादी सहकार आयुक्त स्तरावर अंतीम करणे. | ३०/६/२०२६ | | |

लेखापरीक्षकांच्या नामतालिकेसाठी ऑनलाईन अर्जाचा कालबद्ध सुधारित कृती कार्यक्रम, लेखापरीक्षकांची पात्रता व छाननी संदर्भातील सविस्तर तपशील https://mahasahakar.maharashtra.gov.in/en/ या लिंकवर व सहकार आयुक्त यांचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. सद्यस्थितीत सहकार खात्याच्या लेखापरीक्षक नामिकेवर असलेल्या लेखापरीक्षकांनी व नामिकेवर नव्याने येवू इच्छिणाऱ्या लेखापरीक्षकांनी उक्त निर्धारीत मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

या कार्यालयाने दिनांक १/०४/२०२६ रोजी निर्गमित केलेल्या **अर्ज मागणी, छाननी** कृती कार्यक्रमात बदल झालेला असून या परिपत्रकातील इतर सर्व सूचना कायम आहेत, याची नोंद घ्यावी.

Tawore

**( दिपक तावरे भा.प्र.से.)**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत माहितीस्तव:**

१) मा. प्रधान सचिव (सहकार व पणन ), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) आयुक्त, ( वस्त्रोद्योग ), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर
४) संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,पुणे
५) अपर आयुक्त व विशेष निबंधक, महाराष्ट्र राज्य ,पुणे
६) अपर निबंधक, सहकारी संस्था (वसुली व नियोजन / तपासणी व निवडणूक / प्रशासन)
७) विशेष कार्य अधिकारी तथा अतिरिक्त निबंधक, पदुम लेखापरीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव.

**प्रत :- पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी व सुचना फलकावर प्रसिद्धीसाठी :**

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, सर्व विभाग.
२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण) सर्व विभाग.
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सर्व.
४) जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१ , सहकारी संस्था, सर्व.

उक्त अनुक्रमांक १ ते ४ यांनी आपल्या विभागातील / जिल्ह्यात कार्यरत सनदी लेखापाल, प्रमाणित लेखापरीक्षक संघटना यांना सदरचे सुधारित परिपत्रक निदर्शनास आणून द्यावे.